
# तत्त्वज्ञानातील संशोधनाचे तंत्र व क्षेत्र

SHIVAJI COLLEGE HINGOLI



अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद

फेब्रुवारी 2020

136

Scanned with OKEN Scanner

# तत्वज्ञानातील संशोधनाचे तंत्र व क्षेत्र

: संपादक :

प्रा. वर्षा जपे

डॉ. सुरेन्द्र गायधने

डॉ. सुनील साळुंके

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

अनुक्रमणिका


1. Research As A Tool of Empowerment - -Dr.Murlidhar Kurhade ...007

2. A Tract on Sophodosy : Modes and Models of Contemplation -Dr. S. E. Bhelke ...024

3. Current trends in research in philosophy -Vijay Srinath Kanchi ...055

4. Research Techniques and Areas in Philosophy: An Overview -Ms.Dhanshree Patrikar ...077

5. प्रबंध लिहिताना.... -डॉ.सुरेन्द्र गायधने ...080

6. संशोधन व विश्वकोशनोंद लेखन : प्रयोजन, प्रक्रिया व फलश्रुत -डॉ. शर्मिला जयंत वीरकर ...089

7. भारतीय तत्वज्ञानाच्या संशोधन क्षेत्राचा विकास आणि विकासाची परिणती यांचे चिकित्सक परिक्षण -सौ. वर्षा नितिन जपे ...094

8. संशोधनाचा आराखडा -डॉ. सुनिलदत्त एस. गवरे ...102

9. भारतीय तत्त्वज्ञानातील संशोधनाच्या प्राचीन पद्धती -डॉ. वेदप्रकाश डोणगावकार ...107

10. संशोधन : एक निरंतर चालणारी प्रक्रिया -डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र ...112

11. तत्वज्ञानातील संशोधन तंत्र आणि क्षेत्र -प्रिती नंदकिशोर धुर्वे ...118

12. संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण हे एक महत्वाचे तंत्र –बांगर परमेश्वर शिवाजी ...124

13. 'व्यक्तिची तदेवता' समस्ये संबंधी संशोधनाची आवश्यकता – मोनालिसा अ. खानोरकर ...129

14. धार्मिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तुलनात्मक संशोधनपद्धतीची उपयोगिता -चंद्रकांत प्रल्हाद सोनवणे ...135

15. संशोधनाचा एक परिणाम म्हणून तत्त्वचिंतनाचे बदलते प्रवाह -निखील अरुण पाखोडे ...140


T.C.
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

## 10.संशोधन : एक निरंतर चालणारी प्रक्रिया

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मानवाच्या निर्मिती पासून आजतागायत तो काही तरी नवीन शोधण्याच्या प्रयत्नात असतो. आज घडीला मानवाने जी प्रगती केली आहे ती पूर्णपणे त्याने लावलेल्या नवनवीन शोधांच्या माध्यमातून होय. गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. विश्वाच्या अफाट पसा-यामध्ये मानवाने स्वत:चे वेगळेपण निर्माण केले आहे. बुध्दीचा वापर सतत करत राहील्यामुळे त्याने अखिल विश्वाला गवसनी घातली आहे. मानवी मेंदुला चालना मिळते ती या विश्वात घडत असलेल्या विविध घडामोडीमुळे कारण मानव हा विचारशील प्राणी आहे. असे म्हणतात जो विचार करतो तो संशोधन करू शकतो. त्यामुळे अखिल मानवामध्ये संशोधक हा वेगळ्या प्रकारातील घटक नसतो प्रत्येक माणूस हा संशोधन करु शकतो. शेवटी संशोधन म्हणजे तरी काय या संदर्भात डॉ. दिनेश जनबंधू यांनी केलेली व्याख्या पुढील प्रमाणे आहे. ते म्हणतात संशोधन म्हणजे "आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक घटनांचे शिस्तबध्दरितीने धनात्मक आणि ऋणात्मक परीक्षण होय. " ते पुढे म्हणतात संशोधन करत असतांना निरीक्षण हे त्यातील प्राथमिक तंत्र असते. संशोधन करत असतांना संशोधकाने सुरुवातीला संशोधनाची पहिली पायरी म्हणून सुक्ष्म निरीक्षण केले पाहीजे. ज्यामुळे अचुक संशोधन होऊन संशोधकाचे संशोधन कार्य हे सफल होऊ शकते. निरीक्षण कर्ता निरीक्षण करते वेळी, सतत कार्यक्षम असणे आवश्यक आहे. संशोधन हे सिध्दांत कल्पनेने सुरु होते. सिध्दांत कल्पना केल्या शिवाय आपले संशोधन पूर्ण होवू शकत नाही.



अनेक वेळा अनेक जण एखादी सिध्दांत कल्पना मांडत असतात. त्याचे परीक्षण म्हणजे संशोधन होय. म्हणजे अविश्वास ठेवणे म्हणजे संशोधन होय. उदा. अर्जींठ्याच्या लेण्याचा शोध लावणे म्हणजे संशोधन होय तर मोबाईलचा शोध ही निर्मिती होय. संशोधन आणि निर्मिती यातील हा फरक होय. सिध्दांत आपण खूप मांडू शकतो पण नियम हे कमी असतात हा फरक आहे. संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) मूलभूत संशोधन :मूलभूत संशोधन हे सिध्दांत बनविण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी उपयुक्त असते. एखादा सिध्दांत तयार केल्या शिवाय संशोधन करता येत नाही.

२) उपयोजित संशोधन : उपयोजित संशोधनाच्या माध्यमातून आपण सिध्दांत प्रयोगात आणू शकतो. म्हणजे त्याचा उपयोग कसा करावा याची आपल्याला कल्पना उपयोजित संशोधनाच्या माध्यमातून येते. उदा : फॉर्मूला तयार करणे हे मूलभूत संशोधनाचे कार्य आहे. तर फॉर्मूला वापरणे हे उपयोजित संशोधनाचे कार्य आहे.

३) निष्कर्षीत संशोधन : निष्कर्षीत संशोधनाच्या माध्यमातून आपण केलेल्या संशोधनाच्या निष्कर्षापर्यंत जावून पोहचतो. एखाद्या समस्येची उकल करताना त्या समस्येच्या मुळापर्यंत जावून त्याचा निष्कर्ष काढणे म्हणजे निष्कर्षित संशोधन होय.

४) वर्णनात्मक संशोधन : वर्णनात्मक संशोधनामध्ये त्या समस्येचे संशोधन करताना वर्णन केलेले जाते. उदा. सामाजिक संशोधन होय. सामाजिक संशोधनामध्ये समस्या कोणत्या प्रकारची आहे. तीचे निराकरण कसे केले आहे याचे वर्णन केले जाते. सामाजातील निरनिराळया समस्यांवर उपास सूचविले जातील. निर्णयापर्यंत पोहचत नाही.

५) विश्लेषणात्मक संशोधन : एखाद्या समस्येचे विश्लेषण करून सांगणे म्हणजे विश्लेषणात्मक संशोधन होय. उदा. वैद्यकिय क्षेत्रातील संशोधन हे विश्लेषणात्मक संशोधन होय. एखाद्या रुग्णाच्या आजाराविषयी डॉक्टरांनी केलेले संशोधन हे विश्लेषणात्मक संशोधन असते.



T. C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)
SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

६) अदिशात्मक संशोधन : संशोधन करत असताना सिध्दांत कल्पना आधी तयार न करता केलेले संशोधन म्हणजे अदिशात्मक संशोधन. त्याची कुठल्याही प्रकारची दिशा ठरवून न घेणे. संपूर्ण शोध लागल्यानंतर किंवा संशोधन पूर्ण झाल्या नंतर त्या संशोधनासंबंधी सविस्तर विचार मांडता येतो त्यास अदिशात्मक संशोधन म्हणतात.

७) दिशात्मक संशोधन : ज्या संशोधनाला एक निश्चित अशी दिशा ठरलेली असते त्या संशोधनाला दिशात्मक संशोधन असे म्हणतात. त्या संशोधनाच्या आधारे नवीन नियम तयार केले जावू शकतात.

संशोधनाच्या पाय-या : संशोधन करत असताना संशोधनाच्या पायज्या महत्त्वपूर्ण असतात. एकूणच संशोधन करत असताना आपण निवडलेल्या विषयाकडे गांभिर्याने लक्ष देणे गरजेचे असते. संशोधन हे समाजापयोगी होत असावे अन्यथा आताच्या काळातील बहुतांश संशोधने ही वापराच्या किंवा उपयोगीतेच्या दृष्टिकोनातून कुचकामी असतात. म्हणून संशोधन करत असताना ते पूर्ण वेळ उपयोगी पडेल असे संशोधन करणे गरजेचे आहे. शास्त्रशुध्द पध्दतीने व्हावे यासाठी संशोधन हे पध्दतीशीरपणे झाले पाहिजे त्यासाठी शास्त्रीय संशोधनाच्या पायज्या सांगितल्या जातात त्या पायज्यानुसार संशोधन झाले तर ते संशोधन उपयुक्त आणि उत्कृष्ट संशोधन होत असते. त्यासाठी संशोधनाच्या पायज्या महत्त्वपूर्ण असतात.

१) संशोधनाचा विषय निवडणे / शिर्षक निवडणे :-

संशोधनाचे शिर्षक किंवा विषय हा महत्त्वपूर्ण असतो त्या शिवाय संशोधन दर्जेदार होऊ शकत नाही. त्यासाठी संशोधकाने खूप चिकीत्सक असणे गरजेचे आहे. संशोधन विषय निवडण्यासाठी संशोधकाने किमान चार ते सहा महिने त्यासाठी घालवणे म्हणजे शिर्षका संबंधी आणि अभ्यास विषया संबंधी सखोल विचार करणे आवश्यक आहे. जो अभ्यास विषय संशोधकाने निवडला आहे त्या विषयाला तो पूर्णपणे न्याय देवू शकला पाहिजे. त्या अभ्यास विषयाची समाजोपयोगीता, त्याचे महत्त्व जाणून घेवून त्या संशोधकाने त्या विषयावर काम करण गरजेचे आहे.



२) विषय सर्वेक्षण :

संशोधकाला असे वाटत असते की, आपण निवडलेला विषय हा नवीन आहे. त्यावर आजपर्यंत कुणी काम केलेलेच नाही पण प्रत्यक्षात तसे नसते. आपल्या अगोदरही त्याच विषयावर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून काम / संशोधन झालेले असते. अगोदरच्या संशोधनाचा मागोवा घेणे गरजेचे असते. त्या शिवाय आपल्या संशोधनाचा दर्जा वाढत नाही. अगोदरच्या संशोधकानी कोणत्या पध्दतीची मांडणी केली आहे ते पाहिल्या नंतर होणाज्या चुका सुधारण्यास संशोधकाला वेळ मिळतो. संशोधन दर्जेदार होऊ शकतो.

३) संशोधनाचे ध्येय :

एका संशोधनाला अनेक ध्येये नसतात. पण ध्येयाशिवायही संशोधन पूर्ण होऊ शकत नाही. ठरवून घेतलेल्या ध्येयानुसार झालेले संशोधकाचे संशोधन दर्जेदार होण्यास मदत होते.

४) उद्दिष्ट्ये किंवा गृहीतके :

संशोधनाची गृहीतके ठरवून घेणे आवश्यक असते. गृहीतके ही परीक्षणक्षम असावीत. ती अवास्तव नसावीत. जेणे करून ती आपल्या संशोधनामधून सिध्द व्हावेत.

५) सिध्दांत कल्पना :

सिध्दांत कल्पना ही संशोधनाचा कणा असतो पण एका संशोधनासाठी एकच सिध्दांत कल्पना पुरेशी असते. तिलाच उचित सिध्दांत कल्पना असे म्हणतात. सिध्दांत कल्पनेनुसार आपले संशोधन असावे.

६) साहित्य संकलन :

संशोधन करत असताना अतिमहत्त्वाचा असतो तो भाग म्हणजे साहित्य संकलन हा होय. संशोधनासाठी पुरक साहित्याचे संकलन केल्याशिवाय आपल्या संशोधनास गती येत नाही. म्हणून पुरक साहित्य उपलब्ध करून घेणे हे संशोधकाचे महत्त्वपूर्ण कार्य होय.

संशोधकाने आपले संशोधन कसे समाजोपयोगी होईल याची काळजी घेतली पाहिजे. संशोधन हे दोन प्रकारे महत्त्वपूर्ण असते. एक



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (M.S.)
Scanned with OKEN Scanner

139

गुणात्मक दृष्ट्या, दोन मात्रात्मक दृष्ट्या. गुणात्मक दृष्ट्या श्रेष्ठ ठरणारे संशोधन हे सर्वांच्या ज्ञानामध्ये नवीन भर घालण्यास मदत करते. त्या माध्यमातून किंवा त्या संशोधनाचा आधार घेवून नवीन शोध, नियम तयार केले जातात. मात्रात्मक संशोधन हे त्या संशोधन विषयापुरतेच मर्यादीत राहते. त्या आधारे नवीन नियम तयार केले जात नाहीत. ते संशोधन तेवढ्या विषयापुरतेच मर्यादीत असते. मात्रात्मक संशोधनाचा उद्देश Why हा असतो. त्या माध्यमातून कार्यकारण संबंध शोधता येतो. तर गुणात्मक संशोधनाचा उद्देश हा What हा असतो. तसेच या संशोधनाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या तथ्यांचे आणि सत्यांचे संकलन होते. त्या माध्यमातून नवीन मूल्य प्रस्थापित करता येतात. अशा प्रकारचे संशोधन सर्वकालिक आणि सार्वत्रिक स्वरूपाचे असते. कारण ते परीक्षणक्षम सुध्दा असते. त्या संशोधनाची सिध्दांत कल्पना ही परीक्षणक्षम असते. त्या सिध्दांत कल्पनेचे पूर्व कथन करता येते. त्या माध्यमातून कार्यकारण संबंध शोधून काढता येतात. म्हणून गुणात्माक संशोधन हे मात्रात्मक संशोधनापेक्षा दर्जेदार स्वरूपाचे असते.

**सारांश :** संशोधन हे गतीशील स्वरुपाचे असावे कारण संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. गुणात्मक संशोधनाच्या माध्यमातून कार्यकारण निश्चिती करता येते. कारण हे कार्य मध्येच अव्यक्त स्वरूपात अस्तित्वत असते. त्याचा शोध घेता आला पाहिजे. कारण कार्य-कारण संबंधामध्ये सोपाधिक संबंध नसतो. गुणात्मक दृष्ट्या केलेले संशोधन हे सद्यस्थितीतीलं अंतिम तत्त्व जरी असले तरी कुठलेही संशोधन हे अंतिम म्हणजे शेवटचे असत नाही. उदा :- एकेकाळी मानसशास्त्रीय संशोधनामध्ये सिग्मंड फ्राईचे सिध्दांत हे अंतिम सिध्दांत समजले जात असत. पण आज घडीला फ्राईडचे सिध्दांत हे मानसशास्त्रीय अभ्यासाचे साधन बनले आहे. त्यामाध्यमातून, त्या आधारे आज नवनवीन संशोधकांनी मानसशास्त्रीय क्षेत्रामध्ये अनेक अचंबित करणारे शोध लावले आपण पाहत आहोत. म्हणून संशोधनाच्या क्षेत्रात कोणतेही संशोधन कधीही अंतिम असत नाही जसजशी मानवी ज्ञानामध्ये भर पडत जाईल तसतसे नवीन नवीन ज्ञान



उपलब्ध होत जाते आणि पूर्वीचे अंतिम म्हणवणारे ज्ञान एक ज्ञान साधन म्हणून उपलब्ध राहते. म्हणून संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे असे आपणास म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ -**

१) डॉ. दिनेश जनबंधू, https://www.facebook.com/ycmuast/
२) डॉ. प्रो. गिरीश्वर मिश्र, कुलपती, म. गां. अ. हिं. विश्वविद्यापीठ वर्धा. शोध-प्रविधि : गुणात्मक और मात्रात्मक भाग, ०१, ०२

●●●

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

T.C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)